महत्वाचे पत्र



जा.क्र/कृ.आ./१३-१४/मार्गदर्शकसुचना/फलो-४/ /२०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दिनांक 9/१२/२०१४.

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव
अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना
बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, गोंदिया, भंडारा, गडचिरोली

विषय :- राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान
सन २०१३-१४ मधील प्रकरणांबाबत करावयाची कार्यावही.

संदर्भ :-१. या कार्यालयाचे जावक क्र. कृआ/फलो-६/प्रक्र-२९/रासुसिअ/मासु/५२४/२०१२, दिनांक २/११/२०१२.
२) शासन निर्णय क्र/सुसिंयो-१६१२/प्र.क्र:१ /४अे, दि.२९ /१०/२०१२
३) शासन निर्णय क्र/सुसिंयो-२११४/प्र.क्र.९३/४अे, दि.२९ /११/२०१४
४) मा.अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांची आढावा बेठक दिनांक २/१२/२०१४.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांच्या सन २०१२-१३ साठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील उपलब्ध निधी सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रकरणासाठी उपयोगात आणल्याने सन २०१३-१४ या वर्षासाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या नव्हत्या. तथापि सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविलेले असून त्यासाठी शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी दि.२/१२/२०१४ रोजी घेतलेल्या आढावा बैठकी दरम्यान सदर कालावधीतील प्रलंबित प्रकरणांसाठी निधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच या कालावधीतील प्रकरणे अनुदान अदायागीच्या टप्प्यापर्यंत पूर्ण ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सन २०१३-१४ मध्ये बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची अनुदान प्रकरणे आवश्यक त्या कागदपत्रासह **दि.३१/१२/२०१४** पर्यंत सादर करण्याबाबत प्रसिध्दी द्यावी, जेणे करुन शेतकरी व वितरकांकडून प्रकरणे प्राप्त होतील.

२. तालुका कृषि अधिकारी यांनी सन २०१३-१४ मध्ये बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची यादी संच बसविलेल्या दिनांकाच्या क्रमवारी नुसार, कंपनी प्रतिनीधी व संबंधीत वितरक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने खालील प्रपत्रात **दि.३१/१२/२०१४** पर्यंत प्राप्त करुन ध्यावी.

| अ.क्र | तालुका | गाव | शेतकऱ्याचे पूर्ण नाव ,पत्ता व भ्रमणध्वनी | शेतकऱ्याच्या बँकेचा तपशील | | | शेतकरी प्रवर्ग | | | ८अ प्रमाणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बँकेचे नाव | शाखा आय एफ सी कोड | शेतकऱ्याचा खाते क्रमांक | अ. जा | अ.ज | महिला | धारणा क्षेत्र (हे) | अल्प, /अत्यल्प /बहूभूधारक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

| सर्व्हे क्र./गट क्र. | पिकाचे नाव | लॅटरल अंतर | संच बसविलेले क्षेत्र (हेक्टर)७/१२ नुसार | बिल क्रमांक व दिनांक | संचासाठी विहीत मापदंडानुसार आलेला खर्च | वितरकाचे नाव, पत्ता आणि भ्रमणध्वनी क्रमांक | सुक्ष्म सिचन उत्पादक कंपनीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |

३. यादी सोबत सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या बिलांची छायांकीत प्रत वितरकाने स्वाक्षरीत करुन जोडावी. उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयान्वये राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत सन २०१२-१३ या वर्षासाठी मंजूर केलेले सुक्ष्म सिंचन संचाचे

दर शासनाने संदर्भ क्र. ३ मधील शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ साठी लागू केले आहेत . त्यामुळे बिलांमधील घटकांचे दर सन २०१२-१३ प्रमाणे आहेत याची खात्री करण्यात यावी.

४. तालुका कृषि अधिकारी यांनी संबंधीत वितरकाकडून प्राप्त यादीमधील शेतकरीनिहाय शेतक-याच्या बिलांच्या छायांकीत प्रती वितरकाने स्वाक्षरीत केलेल्या आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी.

५. तालुका कृषि अधिकारी यांनी दिनांक १/४/२०१३ ते दिनांक ३१/३/२०१४ या कालावधीत बसविलेल्या संचाची यादी बिलाच्या दिनांकाच्या क्रमवारीनुसार अंतिम करावी.

६. सन २०१२-१३ पासुन सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी संगणक प्रणालीचा (ऑनलाईन ई-ठिबक) अवलंब करण्यात येत आहे. सन २०१३-१४ मध्ये बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचासाठी " ई-ठिबक" या आज्ञावलीचा अवलंब बंधनकारक आहे.

७. तालुका कृषि अधिकारी यांनी यादीतील शेतक-यांच्या अर्जांची/उपरोक्त तक्त्यातील माहितीची छाननी करावी. छाननी नंतर सदरचे अर्ज त्यांच्या login मधून ई-ठिबक प्रणालीवर भरावेत.

८. ई-ठिबक प्रणालीवर शेतक-याचे अर्ज भरणे आणि त्यानुसार पूर्वसंमती देण्याच्या दोन टप्याचे एकत्रिकरण करण्यात आले असल्याने या शेतक-यांना पूर्वसंमती देण्याची आवश्यकता नाही.

९. म्हणजेच वरील तक्त्यातील माहिती प्राप्त झाल्यानंतर ती तालुका कृषि अधिकारी यांच्या loginमधून ई-ठिबक प्रणालीवर भरल्यानंतर सरळरित्या invoice या टप्यावर कार्यवाही करावयाची आहे.

१०. ई-ठिबक प्रणालीमध्ये वितरकांना login id व password देण्यात येत असून त्यामधुन वितरकांनी जागतीक निविदेच्या म्हणजेच संदर्भ क्र.२ मधील मंजूर दराने Bill Invoice entry करावी. कोणत्याही परिस्थितीत हे काम तालुका कृषि अधिकारी कार्यालयात करण्यात येऊ नये.

११. **मोका तपासणी,-** तालुका कृषि अधिकारी यांनी वितरकाकडून वर नमुद केल्याप्रमाणे बिलांच्या छायांकित प्रतीसह प्राप्त झालेल्या यादीतील **संचाची मोका तपासणी** (राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांच्या सन २०१०-११ साठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील परिशिष्ट-१४ व १५ प्रमाणे) कोणत्याही परिस्थितीत **जानेवारी २०१५ पर्यंत** कृषि सहाय्यक/कृषि परिवेक्षक/मंडल कृषि अधिकारी यांच्याकडून करुन घ्यावी. यासाठी तालुका कृषि अधिकारी यांनी प्रस्तावाची संख्या व कर्मचा-यांचा कामाच्या व्यापाचा विचार करुन कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडल कृषि अधिकारी निहाय मोका तपासणीचे आदेश काढावे. मोका तपासणी करण्यासाठी उपरोक्त तीनही संवर्गाच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या कामाच्या व्याप्तीचा आढावा घेवून मोका तपासणीचे नियोजन व सनियंत्रण तालुका कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. आवश्यकतेनुसार कार्यालयास सलग्न असलेल्या कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी यांना देखील मोका तपासणीचे काम देण्यात यावे. मोका तपासाणी अहवालावर लाभार्थिची / त्याच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी. तसेच अहवाला सोबत प्रक्षेत्रावर जोडणी केलेल्या सुक्ष्म सिंचन संचाचे शेतकरी किंवा त्याचे प्रतिनिधीसह छायाचित्र जोडावे. छायाचित्राचा खर्च कंपनी / वितरक यांनी करावा. वर नमुद केल्या प्रमाणे मोका तपासणी वेळेत करण्यासाठी जिल्हा अधिक्षंक कृषि अधिकारी स्तरावर उपलब्ध करून दिलेल्या आकस्मिक खर्चाच्या निधीचा वापर करावा. या कामासाठी आवश्यक तेवढी वाहने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून संबधीत तालुका कृषि अधिकारी यांनी उपलब्ध करून घ्यावीत. त्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्या मागणीनुसार त्याच्या स्तरावर उपलब्ध करून दिलेला आकस्मिक खर्चाचा निधि त्यांना उपलब्ध करून द्यावा.

१२. कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक /मंडल कृषि अधिकारी यांच्याकडून मोका तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर ई-ठिबक प्रणालीवर ते तालुका कृषि अधिकारी किंवा मंडल कृषि अधिकारी यांच्या login मधून भरावेत.

१३. **अनुदान परिगणना -**

१. लाभार्थीचे अनुदान बँक खात्यात आर.टी.जी.एस. द्वारे वर्ग करण्यात येणार असल्याने लाभार्थीचे बँक खाते, राष्ट्रीयकृत बँकेत किंवा ज्या बँकेत आर.टी.जी.एस प्रणालीची सुविधा आहे तेथेच असणे आवश्यक आहे.

२. तालुका कृषि अधिकारी यांनी मोका तपासणीअंती पात्र ठरलेल्या संचासाठी अनुदान प्रस्ताव संबंधीत शेतकरी/ वितरक यांच्याकडून विहित केलेल्या सर्व अभिलेखासह प्राप्त करुन घ्यावा. (राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांच्या सन २०१०-११ साठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील परिशिष्ट-४ प्रमाणे)

३. मंडल कृषि अधिकारी यांनी वितरकांकडून बिले प्राप्त करुन घ्यावीत आणि कृषि पर्यवेक्षक व कृषि दूसहाय्यकांनी वितरकांच्या मदतीने शेतकऱ्यांकडून आवश्यक त्या कागद पत्रांची उपलब्धता करुन घ्यावी.

४. तालुका कृषि अधिकारी यांनी शासकीय प्रयोगशाळाबरोबरच के.व्ही.के/कृषि विद्यापीठे आणि सहकारी संस्थाकडून माती व पाणी तपासणी करुन घेण्याचे नियोजन करावे.

५. मोका तपासणीच्या आधारे निर्धारीत केलेल्या संच उभारणीच्या किंमतीच्या मर्यादेत व टक्केवारीनुसार अनुदानाची निश्चिती तालुकास्तरावरून करून प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे शिफारशीसाठी सादर करावेत.

६. अनुदान परिगणनेसाठी संदर्भ क्र.१ मधील (सन २०१२-१३ साठी दिलेल्या) ठिबक सिंचन संचाच्या विविध लॅटर अंतरासाठी मंजूर केलेली Annexure- II मधील तुषार सिंचन संचासाठी Annexure- III मधील संच उभारणी खर्च मर्यादा अंतिम समजण्यात याव्यात. तसेच अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी ६० टक्के आणि बहू भूधारकांसाठी ५० टक्के अनुदान देय राहील.

७. उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयात अर्जाची तसेच अनुदान परीगणनेची तपासणी करावी. पात्र प्रस्तावांची अनुदानासाठी शिफारस करून प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवरून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करावेत.

१४. अनुदान वितरण -

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी, कृषि आयुक्तलयाने जिल्ह्यासाठी निश्चित्त केलेल्या लक्षांकाच्या मर्यादेतच, उपविभागाकडून अनुदानासाठी शिफारस केलेल्या प्रस्तावांना मंजूरी द्यावी

२. राज्यस्तरावरुन प्राप्त झालेला केंद्र हिस्सा तसेच जिल्हास्तरावरील राज्य हिस्सा निधी कोषागारातून आहरित करुन जिल्हास्तरावरील बँक खात्यात जमा करावा.

३. मंजूर प्रस्तावानुसार शेतकरी निहाय राज्य हिस्सा व केंद्र हिस्सा अनुदान रक्कमेस Pass for payment करून अंतीम अनुदानाचे वितरण आर.टी.जी.एस. द्वारे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावरुन लाभार्थीचे बँक खात्यात करण्यात यावे

उपरोक्त सूचना सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणून द्याव्यात.सदर बाबीस प्रथम प्राधान्य देवून मोहिम स्वरुपात कार्यवाही करावी.यासाठी जिल्हास्तरावर खास बैठक घेऊन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शन करावे जेणेकरुन उपलब्ध होणारा निधी पारदर्शक प्रध्दतीने व बिनचूकपणे खर्च होईल.

**मा.आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने.**

**संचालक (फलोत्पादन)**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५.

**प्रत :** मा.अपर मुख्य सचिव ( कृषि व पणन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर..